# स्पंदना संस्थेतर्फे गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक प्रशिक्षण

**सोलापूर, दि. ३ (प्रतिनिधी)**- स्पंदना स्वयंसेवी संस्थेतर्फे गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन वालचंद कॉलेजसमोरील अरकाल इन्फोटेक येथे करण्यात आले आहे.

भारतातील माहिती-तंत्रज्ञानाची गरज ओळखून पदवीधर व पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पंदना संस्थेतर्फे मोफत डीटीपी तसेच अकौंटन्सीसंदर्भातील संगणक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मूळचे भारतीय पण विदेशात आय.टी. क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या काही जणांनी स्पंदना ही संस्था स्थापली आहे. संस्थेतर्फे यापूर्वी अनेक गरिबांना उच्च शिक्षण, महागडी सर्जरी आदीसंदर्भात आर्थिक मदत देण्यात आली आहे. याशिवाय ग्रामीण भागात आरोग्यजागृतीसंदर्भात कार्यशाळाही घेण्यात आल्या आहेत. विविध प्रकल्पही राबविले जातात. मोफत संगणक प्रशिक्षणासंदर्भात विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आर्थिक परिस्थिती विचारात घेतली जाणार आहे. अधिक माहितीसाठी दत्तात्रय गालपल्ली यांच्याशी (मो. ९८५०२४७११८) संपर्क साधावा.

TOP